**उलटतपास प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे ॲड. अमित पाटील:-**

मला खरेदीखत दस्त क्र.९१६७/२००७ दाखविण्यात आला. (वादींचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू खरेदीखतास निशाणी देण्याची विनंती केली. प्रतिवादींचे वि. अधिवक्ता यांनी निशाणी देण्यास हरकत नसल्याचे सांगितले म्हणुन सदरहू खरेदीखतास निशाणी देण्यात येते.) सदरहू खरेदीखतास **निशाणी क्र.१४२** देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीचे मुळ मालक बल्लाळ जोशी हे होते. आता मला निशाणी क्र.१२८ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू बक्षीसपत्र बल्लाळ वासुदेव जोशी यांनी लिहुन दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, बक्षीसपत्रामधील पान क्र.६ वर सर्व्हे क्र.६३ ची जमीन गुरे चारण्यासाठी मोह गावकऱ्यांना सदरहू जमीन बल्लाळ जोशी यांनी दिली होती. नोंदणीकृत बक्षीसपत्रात अटी ठेवलेल्या असुन सदरहू जमीन गुरे चारण्यासाठी मोह गावकऱ्यांना दिली होती व गावकऱ्यांना सदरहू जमीन विनामोबदला केवळ गुरे चारण्याकरिता देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.६३ चा ताबेकब्जा सर्व मोह गावकऱ्यांकडे होता. गणु बाळू पाटील प्रतिवादी क्र.१ हे गावातील व्यक्ती आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना सर्व्हे क्र.६३/० विक्री करण्यास आम्ही गावकऱ्यांनी कुठलेही अधिकार दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२० यांना लिहुन दिलेले खरेदीखत चुकीचे व बेकायदेशीर आहे. आता मला खरेदीखत क्र.८९१४/२००७ दाखविण्यात आले. (वादींचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू खरेदीखतास निशाणी देण्याची विनंती केली. प्रतिवादींचे वि. अधिवक्ता यांनी निशाणी देण्यास हरकत नसल्याचे सांगितले म्हणुन सदरहू खरेदीखतास निशाणी देण्यात येते.) सदरहू खरेदीखतास **निशाणी क्र.१४३** देण्यात आले. प्रतिवादी क्र.२ ते १८ हे आमच्या गावचे रहिवासी आहेत. प्रतिवादी क्र.२ ते १८ यांनी प्रतिवादी क्र.१९, २० यांना सदरहू मिळकत विक्री करण्याबाबत आम्ही इतर गावकऱ्यांनी कुठलेही अधिकारपत्र अथवा अखत्यारपत्र दिले नव्हते. प्रतिवादी क्र.२ ते १८ यांना गावाने प्रशासक म्हणुन नेमले नव्हते. प्रतिवादी क्र.२ ते १८ हे सदर जमिनीचे सर्वस्वी मालक नव्हते. प्रतिवादी क्र.२

ते १८ यांनी गावकऱ्यांकडून जमीन विक्री करण्याबाबत कुठलाही ठराव घेतला नव्हता. प्रतिवादी क्र.१९, २० यांच्याकडून आम्हाला कुठलीही रक्कम मोबदला म्हणुन मिळाली नाही. सदरहू जमिनीचा प्रत्यक्ष ताबेकब्जा आजपर्यंत संपुर्ण गावाकडे आहे. प्रतिवादी क्र.२ ते १८ यांनी दिनांक २१/११/२००७ रोजी प्रतिवादी क्र.१९ यांना लिहुन दिलेले खरेदीखत बेकायदेशीर आहे. सदरहू दावा एक सदस्य म्हणुन मी दाखल केला आहे.

**<u>प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे उलटतपास:-</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिवादी क्र.१९ यांच्यातर्फे घेण्यात येणारा उलटतपास स्वीकृत असल्याचे प्रतिपादन केले.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१९ तर्फे ॲड. एस. के. राणे:-</u>**

२. मी १२ वी पास आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत शासनाकडून गावकीला आलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू मिळकत जोशी कुटूंबाची स्व-मालकीची मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, जोशी कुटूंब व आमचे गाव यांचा सदरहू मिळकतीबाबत पुर्वापार वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, जोशी कुटूंबाची मोह गावामध्ये सर्व्हे क्र.१४१ ही मोठी जमीन मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावाचा व माझा सर्व्हे क्र.१४१ बाबत वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.१४१ ही गिरीकेंद्रा रिसॉर्ट यांना विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.१४१ बाबत आमच्या गावातील ७ ते ८ लोकांचा कुळ म्हणुन वाद सुरू होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू ७ ते ८ लोकांमध्ये माझ्या वडिलांचा देखील समावेश होता. सर्व्हे क्र.१४१ व सर्व्हे क्र.६३/० यामधील वाद संपुष्टात यावा याकरिता पनवेल येथे मिटींग घेण्यात आली होती हे मला माहीत नाही. आमच्या गावकीला लिहुन दिलेले बक्षीसपत्र मी वाचले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गिरीकेंद्राला विकलेली जमीन सोडून देण्याच्या मोबदल्यात आम्हा गावकऱ्यांना सर्व्हे क्र.६३/० ही जमीन देण्यात आली होती.

सर्व्हे क्र.१४१ संदर्भात आम्ही दावा दाखल केला होता. **(सदरहू प्रश्नास वादीचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू बाब कैफियतीत नसल्याने व दुसऱ्या सर्व्हे क्रमांकासंदर्भात असल्याने आक्षेप नोंदविला. प्रतिवादी क्र.१९ यांचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू बाब निर्देशांकित झालेल्या बक्षीसपत्रात नमुद असुन दावा मिळकतीच्या सर्व्हे क्रमांकाशी निगडित असल्याचे प्रतिपादन केले. सदरहू बाब दावा मिळकतीशी निगडित असल्याने वादींचे वि. अधिवक्ता यांनी घेतलेला आक्षेप नामंजूर करण्यात येतो.)** मी २-३ इतर दावे माझे वैयक्तिक दाखल केलेले आहेत. मी दावा दाखल करण्यापुर्वी दवंडी पिटवून ग्रामस्थांची सभा घेतली होती. मोह गाव व मोहोगावचा पाडा या दोन्ही गावातील लोकसंख्या मिळुन १५०० असेल. गावच्या सभेला अंदाजे कुटूंबप्रमुख म्हणुन ५०-६० लोक हजर होते. सदरहू ५०-६० लोकांच्या सहया अथवा ठराव मी घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सभेबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा मी घेतलेला नाही.

**प्रतिवादी क्र.१९ यांचे वि. अधिवक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

पनवेल
दिनांक : १८/१२/२०२५.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल